# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. १८/२०१४ दि. ०८.०८.२०१४**

| | |
|---|---|
| **सौ.स्वाती श्रीकांत गोखले<br>जी-६ सागरदर्शन हाईट्स<br>स.गृ.नि.संस्था, थिबा पॅलेस रोड<br>ता. /जि. रत्नागिरी.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर,<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री. श्रीकांत वि.गोखले** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. अनिल वासुदेव महाजन<br>कार्यकारी अभियंता, रत्नागिरी<br>२) श्री. पुरुषोत्तम शां.गांधी<br>उपकार्यकारी अभियंता,<br>ग्रामीण -२ जाकादेवी** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनिमय २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

सौ. स्वाती श्रीकांत गोखले (ग्राहक क्रं. २१०११००४२८८९) रा. थिबा पॅलेस रस्ता, रत्नागिरी यांनी त्यांच्या मौजे कोतवडे ता. रत्नागिरी येथील शेतातील विहीरीवर कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणी अर्ज महावितरणच्या कोतवडे कार्यालयात दि.०८.०३.२०१० रोजी दिला असूनही अद्याप वीज जोडणी मिळाली नाही म्हणून ग्राहकाने दि.०४.०१.२०१२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. त्यासंबंधी मंचाने दिलेल्या दि.०३.०३.२०१२ च्या आदेशानुसार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे 'क्ष' नमुन्यात दि.२५.०४.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. त्याबद्दल कक्षाचा निर्णय दि.२२.०६.२०१२ रोजी देण्यात आला मात्र कक्षाने आदेश दिल्याप्रमाणे कार्यवाही होऊन वीज पुरवठा न मिळाल्याने मंचाकडे 'अ' नमुन्यात दि.०८.०८.२०१४ रोजी तक्रार दाखल केली आहे तक्रारीचा क्र. १८ आहे.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर कार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग महावितरण यांना मंचाच्या दि.११.०८.२०१४ च्या पत्र क्रं. १२० सह तक्रारीची प्रत पाठवून तक्रारी संबंधात स्पष्टीकरण सादर करण्यास कळविण्यात आले. त्याप्रमाणे लेखी स्पष्टीकरण कार्यकारी अभियंता यांच्या दि.०२.०९.२०१४ च्या पत्र क्रं. ६४९८ अन्वये प्राप्त झाले. दरम्यान आयोगाच्या विनियमाप्रमाणे लेखी सूचना पाठवून दि.०९.०९.२०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीसाठी ग्राहकातर्फे श्री. श्रीकांत विनायक गोखले हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. महावितरणतर्फेश्री.अ.वा.महाजन कार्यकारी अभियंता रत्नागिरी व श्री.पु.शा.गांधी, उपकार्यकारी अभियंता ग्रा. २ जाकादेवी हे उपस्थित राहिले.

सुनावणीच्या प्रारंभी मंचाकडून महावितरण अधिकाऱ्यांना कक्षाने आदेश देऊनही वीज पुरवठा अद्याप सुरु न करण्याचे कारण विचारण्यात आले. श्री. अ.वा.महाजन यांनी उत्तरादाखल असे आश्वासन दिले की वीज पुरवठा सुरु करण्यासाठी १३ खांब उभारणीचे काम पुर्ण झाले असून वायरिंगचे काम पुर्ण करुन पुढील २ महीन्यात वीज पुरवठा सुरु करण्यात येईल. तसेच ग्राहकाचा ज्येष्ठता यादीतील क्रं.७ वा असून प्रधान कार्यालयाकडून जेष्ठता न डावलता वीज जोडणी देण्याचे आदेश आहेत.

श्री. श्रीकांत गोखले यांनी २ महिन्यात पुरवठा सुरु होणार असल्यास त्यास संमती असून या प्रमाणे कार्यवाही होत असल्यास समाधानी असल्याचे सांगितले.

उभय बाजुंचे लेखी व तोंडी युक्तिवाद तसेच दाखल झालेली कागदपत्रे विचारात घेता मंचासमोर खालील मुद्दा उपस्थित होतो.

१) ग्राहक नुकसान भरपाईस पात्र आहे काय ?

ग्राहकाने मार्च २०१० मधे वीज मागणी अर्ज महावितरणकडे दाखल करुन त्यासमवेत ७/१२ चे उतारे दिल्याचे ग्राहकाने तक्रारीत नमुद केले. मात्र ग्राहकाने असा अर्ज दिलाच नाही अशी महावितरणची भूमिका असली तरी त्यानंतर नव्याने दिलेला डिसेंबर २०११ च्या अर्जासमवेत

जोडलेले उतारे दि.०८.०३.२०१० व दि.२७.०७.२०१० चे असल्याचे महावितरणने नमुद केले आहे. याबाबत ग्राहकाच्या तक्रार क्रं. २/२०१२ दि. ०४.०१.२०१२ संबंधातील दि.०३.०३.२०१२ च्या आदेशात उल्लेख करण्यात आला आहे. व महावितरणचे स्पष्टीकरण समर्थनीय नाही हे मंचाचे मत नोंदले आहे.

डिसेंबर २०११ मध्ये दिलेल्या अर्जानंतर दि.२४.०२.२०१२ रोजी अंदाजपत्रक मंजुर झाले व दि. ०७.०४.२०१२ रोजी कोटेशन दिले ग्राहकाने दि.२३.०४.२०१२ रोजी रक्कम रु.१४२५/- जमा केल्याचे दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन आढळते. कक्षाने दि. २२.०६.२०१२ च्या आदेशात चाचणी अहवाल देणेत ग्राहकास कळवावे व चाचणी अहवाल प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यात वीज पुरवठा करण्यात यावा असे नमुद केले आहे.

तक्रारदार यांनी दि. ३०.१०.२०१२ रोजी चाचणी अहवाल सादर केल्याचे दाखल कागदपत्रांवरुन आढळते. कार्यकारी अभियंता यानीही त्यांच्या दि.०२.०९.२०१४ च्या पत्र क्रं. ६४९८ मधे चाचणी अहवाल दि.१८ ऑक्टोबर २०१२ मधे प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे जानेवारी २०१३ अखेरपर्यंत वीज पुरवठा सुरु होणे आवश्यक होते. पुरवठा अद्यापही सुरु झालेला नाही.

महावितरणच्या युक्तिवादानुसार शेती पंपाचे कनेक्शन ज्येष्ठता यादीनुसारच देण्याचे प्रधान कार्यालयाचे आदेश आहेत. तसेच विद्युत लोकपालांच्या अभिवेदन क्रं. ६६/२०१३ संबंधीच्या आदेशातील परि. ५ प्रमाणे ज्येष्ठता यादी न डावलता कृषीपंपाचे कनेक्शन द्यावे असे असल्याचे कार्यकारी अभियंता यानी नमुद केले आहे.आयोगाच्या वीज पुरवठा संहिता विषयक विनियम २००५ व कृतीमानकांविषयीच्या विनियम २००६ तसेच महावितरणच्या स्वतःच्या वीज पुरवठयाच्या अटी मधील कलम २.१ याचे नीट वाचन केल्यास असे आढळते की ज्येष्ठता क्रमाप्रमाणे वीज पुरवठा सुरु करतानाच कृती मानकांचेही पालन होणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ ज्येष्ठताक्रमानुसार वीज कनेक्शन देण्याबाबतची महावितरणची भूमिका विनियमांशी विसंगत आहे व म्हणूनच अवैध आहे. ज्येष्ठता यादया तयार करण्याबाबत महावितरणच्या म्हणण्यास कोणताही आधार नाही.

चाचणी अहवाल नसल्यास अर्ज अपूर्ण ठरतो हया म्हणण्यातही तथ्य नाही आयोगाच्य वीज पुरवठा संहिता विनियम २००५ च्या कलम ५.१ व ५.८ प्रमाणे कलम ४.१ नुसार कागदपत्रे सादर करणे अपेक्षित आहे.

कलम ४.१ प्रमाणे विशिष्ट्र कायदयातील तरतुदीप्रमाणे दस्तऐवजांची मागणी संबंधित तरतुदींचा उल्लेख करुनच करता येईल व अशा कागदपत्रांची सूची मागणी अर्जावर उपलब्ध असेल. अर्जाचा नमुना (A-१) व कलम ४.१ मध्येही टेस्ट रिपोर्टचा उल्लेख नाही.

अर्थात टेस्ट रिपोर्ट नसल्याने अर्ज परिपूर्ण नव्हता व म्हणून काम करता आले नाही हे महावितरणचे म्हणणे मान्य करता येत नाही. शिवाय कलम ५.४ नुसार आवश्यक असणाऱ्या व ग्राहकाने सादर न केलेल्या कागदपत्रांची मागणी ग्राहकाकडे करणे आवश्यक आहे.

ग्राहकाने दाखल केलेल्या दि.३०.१०.२०१२ च्या सहाय्यक अभियंता जाकादेवी यांस दिलेल्या पत्रावरुन असे आढळते की दि. ३०.१०.२०१२ रोजी चाचणी अहवाल सादर केला आहे.

आयोगाच्या वीज पुरवठयाविषयीच्या विनियमांच्या कलम ४.१ (७) च्या नंतर प्रथम परंतुकात खालीलप्रमाणे मजकूर आहे.

'परंतु असे की, अर्जाच्या नमुन्यांत (अ) ज्या कामांसाठी मुख्यतः वीज वापरण्यांत येणार आहे त्यांची आणि (ब) वितरण परवानेधारकास जागेवर **वीज पुरवठा सुरु करताना** ज्या कागदपत्रांची आवश्यकता असते त्यांची, ती ज्या कायद्याखाली लागतात त्या कायद्यातील विशिष्ट तरतूदीच्या उल्लेखासह, यादी देण्यांत येईल.'

त्याचे काळजीपूर्वक वाचन केल्यास असे आढळते की, कलम ४.१ (१ ते ६) मधील माहिती/ दस्तऐवज वगळता अन्य सर्व कागदपत्रे **पुरवठा देण्याच्या वेळी** आवश्यक आहेत. महावितरणच्या पुरवठयाच्या अटी चे कलम १३ (पान २५) निरीक्षण व पडताळणीशी संबंधित आहे. त्यातील तरतुदीवरुनही हे स्पष्ट आहे की **अर्जासोबत** टेस्ट रिपोर्ट देण्याविषयी कोणतीही अट नसून **वीज पुरवठा करण्याआधी** ग्राहकाचा टेस्ट रिपोर्ट उपलब्ध झाल्यावर महावितरणकडून टेस्टिंग करण्यात येईल असे नमूद आहे.

वरील सर्व विवचनावरुन हे स्पष्ट आहे की, टेस्ट रिपोर्ट न दिल्यामुळे खांब उभारणी व/वा वीज वाहिनीचे काम करण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती. म्हणूनच ग्राहकाने टेस्ट रिपोर्ट देण्याच्या तारखेपर्यंत म्हणजेच दि.३०.१०.२०१२ पर्यंतच्या विलंबाची जबाबदारी महावितरणचे अधिकारी वर्गावरच आहे.

याविषयी मंचाच्या दि. ३१.१२.२०१३ च्या आदेशात (तक्रार क्रं.५७/२०१३) सविस्तर विवेचन करण्यात आले असून मंच त्याचा प्रस्तुत प्रकरणी पुनरुच्चार करीत आहे. मा. विद्युत लोकपालांच्या निर्दशनास आयोगाच्या वरील तरतुदी आणल्या असल्याचे लोकपालांच्या आदेशात आढळत नाही.

वरीलप्रमाणे तरतुदी विचारात घेता ग्राहकाला वीज पुरवठा करण्यात महावितरणकडून विलंब झाल्याचे स्पष्टपणे आढळते. ग्राहकाने तक्रार अर्जात नुकसान भरपाईची मागणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणी वीज पुरवठा सुरुच झालेला नसल्याने ही मागणी विचारात घेता येत नाही. विलंबाबद्दल भरपाईसाठी ग्राहकाने महावितरणकडे स्वतंत्रपणे मागणी करावी. महावितरणच्या निर्णयाने समाधान न झाल्यास ग्राहक मंचाकडे दाद मागण्यास मुभा आहे.

याप्रमाणे वस्तुस्थिती लक्षात घेता मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

१) **ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

२) **कार्यकारी अभियंता, महावितरण, रत्नागिरी यांनी ग्राहकास दि.३१.१०.२०१४ पूर्वी वीज पुरवठा सुरु करावा.**

**३) आदेशाची अंमलबजावणी झाल्याबाबत पूर्तता अहवाल दि.१५.११.२०१४ पूर्वी मंचाकडे ाादर करावा.**

**४) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :-सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री डी. एस्. जामखेडकर**
**अध्यक्ष**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री ज. पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २५.०९.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**

मी श्री वसंत बापू जगताप या मंचाचा सचिव तथा कार्यकारी अभियंता या नात्याने प्रस्तुत प्रकरणामध्ये मंचाने नोंदविलेल्या निष्कर्षाशी तसेच पारित केलेल्या आदेशाशी सहमत नाही.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) अधिनियम २००५ मधील ५.८ विनिमयानुसार ग्राहकाने वितरण परवाना धारकाकडे अस्तित्वात असणाऱ्या प्रचलित कायद्याखाली हव्या असणाऱ्या सर्व मंजुऱ्या व परवानग्या प्राप्त करुनच आपला अर्ज वीज कनेक्शनसाठी दाखल करणे आवश्यक आहे व असाच अर्ज परिपुर्ण अर्ज समजला जाऊन परवानाधारकाने त्यावर कृती मानंकन अधिनियम २००५ परिशिष्ट अ अनुक्रमांक १(३) अनुसार कार्यवाही करणे गरजेचे आहे. मंचाने नोंदविलेल्या निरिक्षणाचे अवलोकन करता प्रामुख्याने दोन प्रश्न उपस्थित रहातात.

१) जेष्ठता यादी डावलुन वीज कनेक्शन देण्याबाबत अधिनियमामध्ये कोणती तरतुद आहे काय?

२) चाचणी अहवाला व्यतिरिक्त सादर केला गेलेला अर्ज परिपुर्ण होऊ शकतो काय?

वरील दोन्ही प्रश्नांचे उत्तर माझ्या निरिक्षणानुसार नकारार्थी येते, कारण

(१) जेष्ठता यादी डावलून कनेक्शन देण्याकरीता अधिनियमामध्ये आजतागायत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. परवानाधारकाकडून विशिष्ट कारणासाठी हे कनेक्शन मिळण्यासाठी विलंब झाल्यास अर्जदार कृती मानांकने अधिनियामधील तरतुदींच्या आधारे भरपाईची मागणी करु शकतो. या संदर्भात महावितरणकडून सादर करण्यात आलेल्या दस्तऐवज क्रं.५ मधील पाचव्या परिच्छेदामध्ये नमुद केलेले विवेचन लक्षात घेता मा. विद्युत लोकपाल मुंबई यानी देखील अधिनियमामध्ये अशी प्रकारची तरतुद नसल्याचा निष्कर्ष नोंद केलेला आहे. सबब अर्जदाराने वीज कनेक्शनसाठी परिपुर्ण अर्ज दाखल केल्यानंतर महावितरणने योग्य ते प्रयत्न करुन जेष्ठता यादीनुसार कनेक्शन देणे योग्य होईल असे माझे मत आहे व त्यानंतर अर्जदाराला स्वतंत्रपणे अर्ज दाखल करुन कृती मानके अधिनियमानुसार भरपाईची मागणी करता येईल.

२) वीज पुरवठा अधिनियम २००५ विनिमय ४.१ मधील कलम (७) मध्ये अर्जदाराकडून प्रचलीत असणाऱ्या कोणत्याही कायदयाखाली लागणारी अतिरिक्त कागदपत्रे लागू शकतील असे नमुद केलेले आहे. Indian Electricity rule १९५६ मधील कलम २९ व ३० मध्ये कोणतीही वीज वाहीनी उभारणी करणे व ती भारीत करतेवेळी कोणतीही जीवीत वा वित्त हानी होऊ न देण्याची खबरदारी घेण्याची सूचना केलेली असून, क लम ३० (१) मध्ये वीजपुरवठा करणारी वाहीनी अथवा ज्या जागेमध्ये वीज पुरवठा करावयाचा आहे अशी जागा वीजपुरवठयाच्या दृष्टीने सुरक्षित आहे अथवा नाही याची खात्री करण्याची जबाबदारी पुरवठादारावर टाकलेली आहे त्यामुळे खबरदारी म्हणून कोणताही वीज पुरवठा करण्यापुर्वी अथवा वाहीनी उभी करण्यापुर्वी चाचणी अहवालाचा आग्रह करणे योग्य आहे असे मला वाटते व त्यामुळेच वीज पुरवठा अधिनियम २००५ मधील विनिमय ४.१ (७) नुसार अर्जदाराने चाचणी अहवाल सादर करणे गरजेचे आहे.

मा. विद्युत लोकपाल मुंबई यानी देखील त्याचे कडील केस क्रं. ८३/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशामधील परिच्छेद क्रं.४ मध्ये अर्जदारानी, कनेक्शनसाठी भरावी लागणारी रक्कम, चाचणी अहवाल तसेच वाहीनी उभी करण्यासाठी आवश्यक जागा (way leave permission) या बाबी अर्जासोबत सादर करण्याची जबाबदारी अर्जदारावर टाकली असून त्यानंतरच ग्राहकास कृती मानंकन अधिनियमामनुसार दाद मागता येईल असा निष्कर्ष नोंदविलेला आहे.

**श्री. व्ही.बी.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २५.०९.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**